क्र. १५९ पहिले वर्ष

२० ऑगस्ट २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील विसावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात कनानी स्त्रीने आपल्या आजारी मुलीला बरे करण्यासाठी येशूजवळ विनंती केली. दाविदाचा पुत्र तारणारा आहे. हा तिचा विश्वास पाहून येशूला कळवळा आला आणि तिची इच्छा पूर्ण केली. प्रभू येशूला आपले सर्वस्व अर्पण करून आपल्या जीवनाचा स्वामी म्हणून स्वीकारण्यास कृपा मिळावी व श्रध्दा बळकट व्हावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वरा, आमच्या सर्वसमर्थ बापा, सर्व वस्तूंपेक्षा व वस्तूंद्वारे तुझ्यावर प्रेम करण्याकरिता आणि तू आम्हासाठी तयार केलेल्या व कल्पना करता येणार नाही अशा आनंदाच्या राज्यात प्रवेश करण्याकरिता आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन ५६:१,६-७**

**''मी विदेशी लोकांस आपल्या पवित्र पर्वतावर आणीन.''**

परमेश्वर म्हणतो, ''न्यायाचे पालन करा, धर्माचरण करा; कारण माझे तारण जवळ आले आहे, माझे न्यायत्व प्रगट व्हावयास आले आहे.''

तसेच परमेश्वराची सेवा करण्यासाठी, त्याच्या नामाची आवड धरण्यासाठी आणि त्याचे सेवक होण्यासाठी जे विदेशी त्याच्या चरणी जडले आहेत, त्यातील जे कोणी शब्बाथ अपवित्र न करावा म्हणून जपतात आणि करार दृढ धरून राहतात, त्यास मी आपल्या पवित्र पर्वतावर आणीन आणि प्रार्थना मंदिरात त्यांस हर्षित करीन; माझ्या वेदीवर केलेले त्यांचे होम आणि यज्ञ मला पसंत होतील, कारण माझे मंदिर हे सर्व राष्ट्रांसाठी प्रार्थनामंदिर आहे असे म्हणतील.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**६६ : २-३, ५,६,८**

प्रतिसाद : **हे देवा, सर्व राष्ट्रे तुझी स्तुती करोत.**

१. देवाने आमच्यावर दया करावी आणि आम्हाला आशीर्वाद द्यावा त्याने आपला मुखप्रकाश आमच्यावर पाडावा आणि पृथ्वीवर तुझा मार्ग आम्हांला कळावा, तू सिध्द केलेले तारण सर्व राष्ट्रांना जाहीर व्हावे.

२. राष्ट्रे हर्ष करोत आणि जयघोष करोत. कारण तू राष्ट्रांचा न्याय सरळपणे करशील आणि पृथ्वीवरील राष्ट्रांना मार्ग दाखवशील.

३. हे देवा, राष्ट्रे तुझी स्तुती करोत, सर्व राष्ट्रे तुझी स्तुती करोत. देवा आम्हांला आशीर्वाद देवो आणि पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचे भय धरोत.

### दुसरे वाचन

**पौलचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ११:१३-१५,२९-३२**

**''देवा इस्राएल लोकांना दिलेली दाने किंवा त्यांच्यावर केलेले उपकार कधीच परत घेत नसतो.''**

तुम्हा परराष्ट्रीयांना मी सांगतो: ज्याअर्थी मी परराष्ट्रीयांचा प्रेषित आहे त्याअर्थी मी आपल्या सेवेला मोठेपणा देतो; त्यात माझा उद्देश हा की, जे माझ्या हाडामांसाचे आहेत त्यांच्यामध्ये निर्माण करून त्यांच्यातील कित्येकांना तारावे कारण त्यांचा अव्हेर हा जर जगाचा समेट करतो तर त्यांचा स्वीकार हा मेलेल्यातून जिवंत होणे ठरणार ना.

देवाला आपल्या कृपादानांचा आणि पाचारणाचा अनुताप होत नाही. ज्याप्रमाणे पूर्वी तुम्ही देवाची अवज्ञा करत होता परंतु तुम्हांला त्याच्या आज्ञाभंगाने दया प्राप्त झाली आहे, त्याप्रमाणे तुम्हावरील ममतेने त्यांनीही आता ममता प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी आता आज्ञाभंग केला आहे. त्या सर्वावर दया करावी म्हणून देवाने त्या सर्वांना आज्ञाभंगाच्या कोंडवाड्यात कोंडून ठेवले आहे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ६:५१**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू म्हणतो, स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे, ही भाकर जो कोणी खाईल तो सर्वकाळ जगेल.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १५:२१-२८**

**''बाई तुझा विश्वास मोठा आहे.''**

येशू तेथून निघून सोर आणि सिदोन ह्या भागात गेला असताना त्या भागातील एक कनानी बाई येऊन मोठ्याने म्हणू लागली, ''हे प्रभो, दाविद पुत्र, माझ्यावर दया करा. माझी मुलगी भूताने फारच जर्जर केली आहे.'' तरी त्याने तिला एका शब्दानेही उत्तर दिले नाही. तेव्हा त्याच्या शिष्यांनी जवळ येऊन त्याला विनंती केली, ''तिला पाठवून द्या, कारण ती आमच्यामागून ओरडत येत आहे.'' त्याने उत्तर दिले, इस्राएलच्या घराण्यातील हरवलेल्या मेंढरांखेरीज इतर कोणाकडे मला पाठवलेले नाही. तेव्हा ती येऊन त्याच्या पाया पडून म्हणाली, ''प्रभूजी, मला साहाय्य करा.'' त्याने उत्तर दिले, ''मुलांची भाकरी घेऊन ती घरच्या कुत्र्यांना घालणे हे ठीक नव्हे.'' तिने म्हटले, ''खरेच, प्रभो, तरी घरची कुत्रीही आपल्या धन्याच्या मेजावरून पडलेले तुकडे खातात.'' तेव्हा

येशूने उत्तर दिले, ''बाई, तुझा विश्वास मोठा आहे. तुझी इच्छा सफळ होवो आणि त्याच घटकेस तिची मुलगी बरी झाली.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद: **नम्र होऊनी प्रभू, तुज करितो प्रार्थना.**

१. पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स व ब्रदर्स ह्यांनी सत्याचा, न्यायाचा, क्षमेचा व शांतीचा संदेश ख्रिस्ताच्या शिकवणुकी- नुसार जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवावा म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. ख्रिस्त मार्ग, सत्य व जीवन आहे. त्याला सर्व युवकांनी सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये मोकळ्या मनाने व उत्साहाने अनुसरावे व त्याचे साथीदार बनावेत म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. जे लोक देवापासून दूर गेलेले आहेत अशांना प्रभूच्या प्रेमाचा अनुभव यावा, ते ख्रिस्ताकडे आकर्षिले जावे म्हणून आपण प्रार्थना करू या

४. आपल्या धर्मग्रामातील सर्व आजारी व वृध्द लोकांना ईश्वरी प्रेमाने आरोग्यदान लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंची आठवण करू या. (शांतता) हे हेतू सफल व्हावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या ह्या भेटीचा स्वीकार कर. तू दिलेल्या भेटीमधूनच आम्ही तुला ही भेट अर्पण करीत आहोत. ह्या आमच्या भेटीबद्दल परतभेट म्हणून तू स्वत:च आमच्या भेटीस ये. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे दयाळू परमेश्वरा, या पवित्र संस्काराद्वारे तू आमचे ख्रिस्ताबरोबर ऐक्य घडवून आणतोस. या पृथ्वीवर आम्ही अधिकाधिक त्याच्यासारखे बनावे व त्याच्या स्वर्गातील वैभवात सहभागी होण्यास पात्र ठरावे म्हणून आम्हांला साहाय्य कर. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## चिंतन

यहुदी आणि बिगरयहुदी लोकांमधील परस्परसंबंध कमालीचे विकोपाला गेलेले होते. यहुदी लोक कनानी लोकांना अक्षरश: कुत्र्यासारखी वागणूक देत असत. अशा पार्श्वभूमीवर त्यांच्यातील परस्परसंबंध सुरळीत करण्याच्या हेतूने आजची तिन्ही वाचने आपल्यासमोर काही महत्त्वाची चिंतने सादर करतात.

**अ) परमेश्वराची अस्सल आराधना द्वेषाच्या भिंती पाडून टाकण्यास आणि प्रेमाचे सेतू उभारण्यास हातभार लावते :** आजच्या पहिल्या वाचनात (यशया ५६: १, ६-७) आपल्या निवडलेल्या इस्राएली लोकांव्यतिरिक्त इतरांवरही परमेश्वर कसे प्रेम करतो त्याचे दर्शन घडते. केवळ शब्बाथ पाळणारे इस्राएलीच नाही तर इतर जनही आपल्या मंदिरात प्रार्थना करण्यासाठी येऊ शकतील अशी परमेश्वराची सर्वसमावेशक वृत्ती इथे प्रतिबिंबित झालेली आहे. अशा परमेश्वराची अस्सल उपासना करणारे आपापसांतील वैरभाव विसरून शांती सलोख्याने नांदू शकतात.

**ब) परराष्ट्रीयांना नाकारणे हे जगाशी मैत्री करण्यासारखे आहे :** मात्र त्यांचा मोकळ्या मनाने स्वीकार करणे ह्यातच जगाचे तारण दडलेले आहे. आजचे दुसरे वाचन (रोम.११:१३-१५, २९-३२) रोमच्या लोकांचे परराष्ट्रीयांशी असलेले संबंध सुधारण्यासाठी मार्गदर्शन करते. ज्याप्रमाणे यहुदी लोकही कधीतरी आज्ञाभंगाचे पातक करीत होते तसेच बिगरयहुदी आज ते पातक करीत असावेत. मात्र परराष्ट्रीयांचा प्रेषित असलेला संत पौल यहुद्यांनी त्यांचा स्वीकार करावा, असे सुचवितो.

**क) श्रध्दा ही सामाजिक दुष्प्रवृत्तीवर मात करण्यास साहाय्यभूत ठरते :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १५:२१-२८) प्रभू येशू एका कनानी स्त्रीचा विश्वास पाहून तिच्या मुलीला बरे करतो. बिगर यहुदी लोकांसाठी वापरण्यात आलेला ''कुत्रा'' हा शब्द आज आपल्याला कितीही खटकत असला तरी त्यावेळच्या संदर्भाचे ते प्रतिबिंब होते. ती स्त्री त्याचाच आधार घेऊन किमान 'चुरा' तरी मिळावा अशी अपेक्षा प्रकट करते. तिची ही श्रध्दा सामाजिक दुष्प्रवृत्तीवर मात करते आणि तिची इच्छा सफळ होते.

**आत्मपरीक्षण :** इतर धर्मीय व परप्रांतीय ह्यांच्याविषयी माझा दृष्टिकोन कसा आहे? सामाजिक दुष्प्रवृत्तीवर मात करण्यासाठी माझी श्रध्दा कशी काय साहाय्यभूत ठरते? ●●●

| ऑगस्ट २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम २१ | सं पायस दहावा (पां) | : शास्ते २:११-१९/मत्तय १९:१६-२२ |
| मंगळ २२ | मरियेचे राणीपद (पां) | : शास्ते ६:११-२४/मत्तय १९:२३-३० |
| बुध २३ | लीमाची सं रोझ (हि) | : शास्ते ९:६-१५/मत्तय २०:१-१६ |
| गुरु २४ | सं बार्थोलोम्यू - प्रेषित (तां) | : शास्ते ११:२९-३९/मत्तय २२:१-१४ |
| शुक्र २५ | सं लूईस (हि) | : रूथ १:१, ३-६, १४-१६, २२/मत्तय २२:३४-४० |
| शनि २६ | सं झेफिरिनस (हि) | : रूथ २:१-३, ८-११, ४:१३-१७/मत्तय २३:१-१२ |